**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

## FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे ग्रामीण | **P.S.(ठाणे):** शहापूर | **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0505

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/12/2022 23:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 08/03/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/10/2022

**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 21:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/12/2022 **Time (वेळ):** 22:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 029

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/12/2022 22:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिलदार कार्यालय शहापुर ,शहापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस निरीक्षक, शहापूर पोलीस स्टेशन ठाणे (ग्रा.)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विनोद भाऊ शेलार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नांदपगाव,कल्याण ,शहापूर ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नांदपगाव,कल्याण ,कल्याण तालुका,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 मिलींद नारायण राऊत | | | 1. तहसिलदार कार्यालय शहापुर , शहापुर ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र, भारत |
| 2 | 2 ओंकार एकनाथ पातकर | | | 1. शहापुर ,शहापुर ,ठाणे ग्रामीण , महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.**,**जर असल्यास**)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (**प्रथम खबर हकीकत **):**

फिर्याद दिनांक 30/12/2022

मी विनोद भाऊ शेलार वय30 वर्षे, रा.नांदपगाव, ता.कल्याण, जि.ठाणे असा असुन आज रोजी फिर्याद देतो की, माझी अज्जी श्रीमती यमुनाबाई सखाराम बजागे ,वय.65 वर्ष रा.वांद्रे ता.भिवंडी जि.ठाणे यांना नडगाव (लेनाड) ता.शहापुर जि.ठाणे येथे सर्वे नंबर 246/2 मधील 1.11.00 हे.आर चौ.मी जमीन व सर्वे नंबर 9/2 मधील 0.50.00 हे.आर. चौ. मी जमीन वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे. सदर शेत जमीन माझ्या आजीने त्यांची मुले 1)श्री पंढरीनाथ सखाराम बजागे,2)श्रीमती वंदना भाऊ शेलार,3) श्रीमती गुलाब भगवान ठाकरे 4)श्रीमती आशाबाई हिरामण भोईर यांना बक्षीस पत्राद्वारे दिलेली आहे.यातील श्रीमती वंदना भाऊ शेलार ही माझी आई आहे.

माझी आई,मामा व मावशी यांनी सदर बक्षीसपत्राद्वारे प्राप्त जमीन त्यांच्या नावावर होण्या करिता महसुल विभागाकडे अर्ज दिला होता.त्याप्रमाणे तलाठी सजा नडगाव (लेनाड) यांनी फेरफार तयार केला होता. परंतु अज्जीच्या भावाची पत्नी श्रीमती सिताबाई शिवराम तरणे यांनी सदर फेरफाराबाबत तहसीलदार शहापुर यांच्याकडे हरकत नोंदिवली होती.त्यानुसार खटला क्रमांक 47/2021 अन्वये सुनावणी तहसीलदार शहापुर यांच्याकडे चालु होती.माझी आई व मावशी या अशिक्षित असल्याने त्याच्या वतीने सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन पाठपुरावा मी स्वतः करीत होतो.

वरिल प्रकरणाची सुनावणी चालु असतांना त्याबाबत चौकशी करण्याकरिता मी दिनांक 23/02/2022 रोजी तहसीलदार, शहापुर यांच्या कार्यालयात गेलो असतांना तेथील कार्यालयीन शिपाई मिलींद राऊत या व्यक्तीशी माझी भेट झाली. सदर व्यक्तीकडे मी खटल्याच्या अनुशंगाने विचारणा केली असता त्याने मला मा.तहसीलदार शहापुर यांची भेट घेण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी मा.तहसीलदार यांची भेट घेवुन खटल्याच्या अनुशंगाने बोलणी केली.मा. तहसीलदार यांनी माझे काम पुढील तारखेस होईल असे मला सांगीतले. त्यानंतर तहसीलदार यांच्या कक्षा मधुन बाहेर आल्यानंतर शिपाई मिलींद राऊत यांनी मला बोलवुन खटल्याची पुढील तारीख दिनांक 08/3/2022 रोजी असल्याचे सांगुन केसचा निकाल माझी आई,मामा व मावशी यांच्या बाजुने लावायचा असल्यास रुपये 2,50 , 000/-द्यावे लागतील असे सांगीतले.तसेच दिनांक 08/03/2022 रोजी केसचा निकाल लागल्यानंतर अधिक बोलणी करणार असल्याचे सांगीतले.

शिपाई मिलींद राऊत हे माझी आई,मामा व मावशीच्या बाजुने निकाल लावण्या करिता मागणी करित असलेली रक्कम 2,50,000/- (दोन लाख पन्नास हजार) ही लाच असल्याचे मला समजले. परंतू , मिलींद राऊत यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने त्यांच्या विरूध्द कायदेशिर कारवाई होणेकरीता दिनांक 07/03/2022 रोजी मी अँन्टी करप्शन ब्यूरो , ठाणे कार्यालयात समक्ष उपस्थीत राहून मिलींद राऊत, शिपाई, नेमणूक तहसिलदार कार्यालय , शहापूर यांचे विरूध्द लाचेच्या मागणीची तक्रार दिली होती, माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दोन शासकीय पंचाना पाचारण करण्यात आले.

दिनांक 08/03/2022रोजी मला लोकसेवक यांची भेट घेण्या करीता तहसिल कार्यालय, शहापूर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले त्या वेळी तहसिलदार कार्यालयात माझा मावस भाऊ , मामा, याचिकाकर्ते व दोन्ही पक्षकारांचे वकील हजर होते. मी मिलींद राऊत यांचा शोध घेतला परंतू ते आढळून आले नाही. खटल्याच्या सूनावणीकरीता आम्ही दोन्ही पक्षकारांना तहसिलदार यांच्या कक्षामध्ये बोलविण्यात आले. तहसिलदार यांनी दोन्ही पक्षांची बाजू ऐकून घेवून दि 15/03/2022रोजी निकालाची सूनावणी ठेवली असल्याबाबत सांगीतले. त्यानूसार आम्ही दोन्ही पक्षकार कक्षामधून बाहेर आलो. मी कार्यालयातील उपस्थित इतर कर्मचारी यांचेकडे मिलींद राऊत यांचे बाबत विचारणा केली असता ते कार्यालयात आले नसल्याचे त्यांनी सांगीतले. त्यामूळे मिलींद राऊत यांचेशी माझी भेट होवू शकली नाही.

दिनांक 15/03/2022रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता मला तहसिलदार कार्यालय, शहापूर येथे



शहापूर पोलीस स्टेशन (ग्रा.)

पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले त्यावेळी माझी भेट मिलींद राऊत यांचेशी झाली, मिलींद राऊत यांनी मला तहसिलदार यांचे कक्षामध्ये नेले. तेथे तहसिलदार श्रीमती निलीमा सूर्यवंशी उपस्थित होत्या. मिलींद राऊत यांनी मला किती तारीख दिली आहे असे विचारले? मी एकोणतीस तारीख असल्याचे सांगीतले . मिलींद राऊत यांनी त्यावेळी क्लोज करू असे मला सांगीतले. मी केस लवकर क्लोज करणास तहसिलदार यांना विनंती केली असता तहसिलदार श्रीमती सूर्यवंशी यांनी केसचे पेपर दाखविण्याबाबत राऊत यांना सांगीतले. मिलींद राऊत यांनी मला तारखेच्या आधल्या दिवशी दिनांक 28/03/2022रोजी येण्यास सांगून त्या दिवशी केसची फाईल तहसिलदार यांना दाखवितो असे सांगीतले. त्यानंतर राऊत यांचे सोबत मी तहसिलदार यांचे कक्षामधून बाहेर आलो. मिलींद राऊत यांनी मला अठ्ठाविस तारखेला येण्यास सांगून मॅडमला फाईल दाखविल्यावर त्या वाचून एकोणतिसला निकाल देवून टाकतिल व त्यानंतर दोन तीन दिवसात मॅडमशी चर्चा करून पाकीट देवून टाकायचं असे सांगीतले.

दिनांक 28/03/2022रोजी मी खाजगी कामामध्ये व्यस्त असल्याने दिनांक 29/03/2022रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता मला तहसिलदार कार्यालय, शहापूर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले. त्यावेळी तहसिलदार कार्यालयात माझा मावस भाऊ श्री सतिश भोईर , मामा श्री पंढरीनाथ बजागे, मावशी श्रीमती ठाकरे तसेच आमचे वकील श्री गिरीष पाटील हे देखील तेथे उपस्थित होते, सूनावणीकरीता आम्ही सर्व तहसिलदार यांच्या कक्षात गेलो. आमच्या वकिलांनी तहसिलदार यांच्याशी केसबाबत संवाद साधल्यानंतर आम्ही कक्षातून बाहेर आलो. मिलींद राऊत यांच्याकडे मी खटल्याबाबत चौकशी केली असता त्यांनी सदर खटला क्लोज केला असल्याचे सांगीतले. तसेच दोन ते तीन दिवसात ऑर्डर भेटेल असे सांगीतले.

दिनांक 01/06/2022रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरिता मला तहसिलदार कार्यालय, शहापूर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले, मिलींद राऊत यांची मी भेट घेतली. त्यांनी मला खटल्याची फाईल दाखविल्यानंतर ती फाईल तहसिलदार यांचे कक्षामध्ये घेवून गेले, तहसिलदार यांच्या कक्षामधून बाहेर येवून मला जमीनीची कशी वाटणी केली आहे? याबाबत तहसिलदार मॅडम या विचारत असल्याचे सांगीतले. मी त्यांना प्रकरणाची सर्व माहीती दिली. त्यानंतर मिलींद राऊत पून्हा तहसिलदार यांच्या कक्षामध्ये गेले थोड्यावेळाने राऊत हे तहसिलदार यांच्या कक्षामधून बाहेर आले, व मला एक कागद दाखविला. त्यावर 2.5असा निळ्या शाईच्या पेनाने आकडा लिहीला होता. त्यानंतर सदरचा कागद राऊत यांनी पून्हा त्यांच्या पॅन्टच्या खिशामध्ये ठेवून दिला. राऊत यांनी मॅडमला विचारले असून त्या अडीच बोलल्या असल्याचे मला सांगीतले. मी राऊत यांना अडीच हजार का? असा प्रश्न विचारला असता त्यांनी अडीच लाख असे सांगीतले. सदर रकमेमध्ये कमी करण्याची विनंती करण्याकरीता तहसिलदार यांची भेट घेण्याबाबत मी त्यांना विचारले असता मॅडमनी निरोप दिलेला असून लगेच भेटल्यास त्यांना तू घाई करतोस असे वाटेल म्हणून दोन दिवसांनी येण्यास राऊत यांनी सांगून तेव्हा ते स्वतः मला तहसिलदार यांचेकडे घेवून जातील व समोरासमोर बोलणी करून देणार असल्याचे सांगीतले.

दिनांक 22/06/2022रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता मला तहसिलदार कार्यालय, शहापूर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले,मी कार्यालयात जावून मिलींद राऊत यांची भेट घेतली, राऊत हे मला तहसिलदार श्रीमती सूर्यवंशी यांच्या कक्षामध्ये घेवून गेले. त्यावेळी राऊत यांनी तहसिलदार यांना आमच्या खटल्याबाबत सर्व माहीती दिली. तहसिलदार यांना केसच्या निकालाची प्रत मिळण्यास मी विनंती केली. तहसिलदार यांनी राऊत यांना ऑर्डर केली आहे का? या बाबत विचारले असता त्यांनी केस क्लोज केली असल्याचे सांगीतले. त्यानंतर तहसिलदार यांनी ऑर्डर काढायला सांगते असे सांगितले. त्यानंतर राऊत मला कक्षामधून बाहेर घेवून आले. ऑर्डर कधी मिळेल? याबाबत राऊत यांना मी विचारले असता त्यांनी दोन ते तीन दिवस लागतील असे सांगीतले राऊत यांनी रकमेबाबत तहसिलदार यांच्याशी बोलणी का नाही केली? असे मला विचारले. त्यांनी पैशाचा विषय न काढल्यामूळे मी बोलणे टाळल्याचे त्यांना सांगीतले. तहसिलदार यांची पून्हा कधी भेट घेवू असे मी विचारले असता राऊत यांनी दिनांक 23/06/2022रोजी कार्यालयात येण्यास सांगीतले.

दिनांक 23/06/2022रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता मला तहसिलदार कार्यालय, शहापूर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले,मी कार्यालयात जावून राऊत यांची भेट घेतली राऊत यांना मी तहसिलदार यांची भेट घ्यायची असल्याचे सांगीतले त्याप्रमाणे राऊत हे मला तहसिलदार यांचे कक्षामध्ये घेवून गेले. त्यावेळी कक्षामध्ये तहसिलदार व इतर व्यक्ती उपस्थीत होत्या. राऊत यांनी एका सफेद रंगाचा शर्ट परिधान केलेल्या व्यक्तीकडे हात करून "यांच्याशी बोलुन घे" असे मला सांगीतले. त्यानंतर राऊत हे मला कक्षातून बाहेर घेवून आले. त्यांच्या पाठोपाठ सफेद रंगाचा शर्ट परिधान केलेली व्यक्ती देखील कक्षामधून बाहेर आली. त्या व्यक्तीने मला खटल्याबाबत माहीती विचारली. त्यानूसार मी त्यांना माहीती दिली. ती व्यक्ती तहसिलदार यांच्या कक्षामध्ये गेली. व आमच्या खटल्याची फाईल घेवून आली. त्या व्यक्तीने माझेशी प्रकरणाबाबत चर्चा करून पून्हा

फाईल घेवून तहसिलदार यांच्या कक्षामध्ये जावून पून्हा बाहेर आली. त्यानंतर त्या व्यक्तीने त्याच्या मोबाईल फोनवर कॅल्क्यूलेटर चालू करून त्यामध्ये 3आकडा टाकून मला दाखविला. राऊत यांनी यापूर्वी अडीच सांगीतले असल्याचे मी त्या व्यक्तीस सांगीतले. तसेच जमीन ही घरातील व्यक्तींचीच असल्याचे देखील सांगीतले. त्या व्यक्तीने "तूला कीती देता येतील ते सांग?" असे बोलून "तहसिलदार यांना ती रक्कम सांगून टाकू व काहीतरी करायला लागणार ना त्यांना" असे मला सांगीतले. त्या व्यक्तीस मी स्वतः तहसिलदार यांच्याशी बोललो असतो असे सांगीतले. त्यास त्या व्यक्तीने नकार देवून "मॅडम या विषयावर तूमच्याशी डायरेक्ट नाही बोलणार" असे मला सांगीतले. रकमेमध्ये कमी करून पन्नास हजार घेण्यास मी त्या व्यक्तीस सांगतीले. त्यांनी त्यास नकार देवून मॅडमशी बोलून बघतो असे सांगीतले तसेच तहसिलदार यांच्या कक्षामध्ये आल्यावर घरातला विषय आहे, असे सांगण्यास मला सांगीतले. सदर व्यक्ती पून्हा तहसिलदार यांच्या कक्षामध्ये जावून बाहेर आली व प्रकरणात आदेश काढावा लागणार असल्याचे सांगून पून्हा त्यांच्या मोबाईल मधे तीन आकडा टाईप करून हे लास्ट असल्याचे मला सांगीतले, मी तहसिलदार यांना रिक्वेस्ट करू का? असे विचारले असता त्यांनी त्यास होकार दर्शविला. त्यानूसार त्या व्यक्तीसोबत मी तहसिलदार यांच्या कक्षामध्ये गेलो कक्षामध्ये तहसिलदार श्रीमती सूर्यवंशी ह्या उपस्थित होत्या. राऊत देखील कक्षामध्ये उपस्थीत झाले. सदर व्यक्तीने तहसिलदार यांना माझ्याशी बोलणी झाली असल्याबाबत सांगून सदर प्रकरण घरातील असल्याचे मी सांगत आहे असे सांगीतले, मी तहसिलदार श्रीमती सूर्यवंशी यांना सदर प्रकरण हे घरातीलच असल्याचे सांगताच तहसिलदार यांनी त्यांना सर्व प्रकरण माहीत असल्याचे सांगीतले, त्या व्यक्तीने प्रकरणामध्ये सूनावण्या झालेल्या असल्याबाबत मला सांगीतले. मी तहसिलदार श्रीमती सूर्यवंशी यांना काहीतरी कमी करण्याबाबत विनंती केली. त्या व्यक्तीने मला बाहेर येण्यास सांगीतले. त्यानूसार मी त्या व्यक्ती सोबत कक्षाच्या बाहेर आलो त्या व्यक्तीने मला खटल्याच्या फाईल मधील कागदपत्रे दाखवून या प्रकरणात दहा बारा हिअरिंग झाल्या असल्याच्या सांगीतले. मी त्या व्यक्तीस त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव "ओंकार पातकर"असे सांगीतले. पातकर यांना तहसिलदार मॅडम या काहीच बोलत नाही असे विचारले असता त्यांनी मॅडम नाही बोलणार असे मला सांगीतले. राऊत यांनी अडीच लाख सांगीतले होते आता तूम्ही तीन लाख सांगतात तेवढे बजेट नसल्याचे  पातकर यांना मी सांगीतले. पातकर यांनी मॅडम जे सांगतात तेच सांगीतलं असे बोलून मॅडम या मध्ये काहीच बोलणार नाही. असे देखील मला सांगीतले. राऊत यांच्याशी बोलून कळवितो असे पातकर यांना मी सांगून कार्यालयातून निघून आलो.

दिनांक 24/06/2022रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता मला तहसिलदार कार्यालय, शहापूर येथे पंचासमवेत  डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले,मिलींद राऊत यांना मी भेटुन घेवून त्यांना मला तहसिलदार यांची भेट घ्यायची असुन त्यांच्याशी तीन लाख रकमेबाबत चर्चा करायची असल्याचे सांगीतले. परंतू तहसिलदार मॅडम कार्यालयामधून निघून गेल्याने त्यांची भेट झाली नाही.

दिनांक 27/06/2022रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता मला तहसिलदार कार्यालय, शहापूर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले, मी कार्यालयात जावून राऊत यांची भेट घेतली. राऊत यांनी मला तहसिलदार यांची भेट घेण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी तहसिलदार यांच्या कक्षामध्ये गेलो. त्यावेळी कक्षामध्ये तहसिलदार श्रीमती सुर्यवंशी, ओंकार पातकर व एक दूसरी व्यक्ती उपस्थीत होती, तहसिलदार श्रीमती सूर्यवंशी यांनी मला काय काम आहे असे विचारले. मी त्यांना खटल्याबाबत सांगीतले त्यावेळी पातकर यांनी मी यापूर्वी येवून गेलो असल्याचे तहसिलदार मॅडम यांना सांगीतले. तहसिलदार श्रीमती सूर्यवंशी यांनी त्यास होकार देवून मला थांबण्यास सांगीतले. त्यानूसार मी तहसिलदार यांच्या कक्षाच्या बाहेर निघून आलो. काहीवेळाने राऊत मला तहसिलदार यांच्या कक्षात घेवून गेले तहसिलदार श्रीमती सूर्यवंशी यांना मी खटल्याबाबत सांगून राऊत यांनी अडीच लाख व पातकर यांनी तीन लाख सांगीतले असून तूम्हीच काय ते बोला असे सांगीतले. त्यावेळी तहसिलदार श्रीमती सूर्यवंशी यांनी त्यांनी कोणास काही सांगतले नसल्याचे मला सांगीतले. त्यानंतर राऊत मला तहसिलदार यांच्या कक्षाच्या बाहेर घेवून आले व ते पून्हा तहसिलदार यांचे कक्षामध्ये गेले. थोड्याचवेळात राऊत हे तहसिलदार यांच्या कक्षामधून बाहेर आले व त्यांनी मला जाण्यास सांगून नंतर बघू असे सांगीतले,

दिनांक 24/08/2022रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता मला तहसिलदार कार्यालय, शहापूर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले, माझी भेट ओंकार पातकर यांचेशी झाली. पातकर यांनी मला आठ ते दहा दिवस थांबुन राहणे बाबत सांगुन तहसीलदार श्रीमती सुर्यवंशी यांची बदली असल्याने नविन तहसीलदार आल्यानंतर त्यांच्याकडुन काम करुन देतो असे सांगीतले. त्यानंतर मिलींद राऊत यांच्यासह मी तहसीलदार यांची भेट घेण्याकरिता त्यांच्या कक्षामध्ये गेलो. त्यावेळी कक्षामध्ये तहसीलदार श्रीमती सुर्यवंशी,लिपीक श्री विष्णु उपस्थीत होते. तहसीलदार श्रीमती सुर्यवंशी यांना मी खटल्याच्या निकालाबाबत विचारणा केली असता त्यांनी सदर केसचा निकाल दिला असल्याचे सांगीतले व लिपीक श्री विष्णु  यांना खटल्याच्या निकालाबाबत मला

माहीती देण्यास सांगीतले. त्यानंतर लिपीक श्री विष्णु व मिलींद राऊत यांच्यासह मी तहसीलदार यांच्या कक्षामधुन बाहेर आलो. श्री विष्णु यांना खटल्याच्या निकाला बाबत मी विचारले असता त्यांनी राऊत यांना फोन करुन येण्यास सांगीतले.

दिनांक 25/08/2022रोजी मला तहसिलदार कार्यालय शहापूर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले, कार्यालयात राऊत आढळून न आल्याने मी श्री विष्णु यांची भेट घेवुन त्यांच्याकडे खटल्याच्या निकालाबाबत चौकशी केली.श्री विष्णु यांनी खटल्याची फाईल त्यांच्याकडे आहे परंतु,सदर प्रकरणाबाबत अधिक माहीती ते देवु शकत नसल्याचे सांगुन राऊत यांना फोन करुन उद्या येण्यास सांगीतले. तसेच केसचा निकाल लावलेला नसल्याचे सांगुन तहसीलदार मॅडम जसे सांगतील तसे काम होईल असे देखील सांगीतले.

दिनांक 26/08/2022 रोजी मला तहसीलदार कार्यालय,शहापुर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले.मी कार्यालयात राऊत यांची भेट घेतली.त्यावेळी राऊत यांनी ऑर्डर तयार नसल्याचे मला सांगुन आमच्या खटल्याची फाईल तहसीलदार या क्लोज करीत नव्हत्या परंतु त्यांनी तहसीलदार यांना सांगुन फाईल क्लोज करुन घेतली असल्याचे सांगीतले.मी तहसीलदार यांची त्याच्या कक्षामध्ये जावुन भेट घेवुन त्यांना खटल्याच्या निकालाबाबत विचारले.त्यावेळी तहसीलदार श्रीमती सुर्यवंशी यांनी ऑर्डर काढते असे मला सांगीतल्या नंतर मी कक्षामधुन बाहेर आलो.राऊत यांना खटल्याचा निकाल घेण्यासाठी कधी येवु असे विचारले असता राऊत यांनी बुधवारी येण्यास सांगीतले.

दिनांक 19/10/2022 रोजी मला तहसीलदार कार्यालय,शहापुर येथे पंचासमवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पाठविण्यात आले. त्यावेळी मी राऊत यांची भेट घेवुन खटल्याच्या निकालाबाबत विचारणा केली असता त्यांनी निकालाची सत्यप्रत श्री उमेश जाधव नावाची व्यक्ती घेवुन गेली असल्याचे सांगीतले.मी त्यांना कोण उमेश जाधव?असे विचारले असता त्यांनी माझ्या मावस भावाने श्री जाधव या व्यक्तींस सदर निकाल घेवुन जाण्यास सांगीतले होते.त्यानुसार ते अर्धातासापुर्वीच निकालाची प्रत घेवुन गेले असल्याचे सांगीतले.त्याबाबत मी माझा मावस भाऊ श्री सतिश भोईर यांस फोन करुन विचारले असता त्यांनी सांगीतले की, खटल्याच्या निकालाची प्रत तहसीलदार कार्यालय,शहापुर येथुन घेवुन जाण्याकरिता त्यांनी श्री अनंता जाधव व श्री उमेश जाधव यांना सांगितले होते.

माझी आई,मामा व मावशी यांच्या तहसीलदार कार्यालय,शहापुर येथे दाखल असलेल्या खटला क्रमांक 47/2021 मध्ये तहसीलदार, शहापुर यांनी दिलेल्या निकालाची प्रत माझा मावस भाऊ श्री सतिश भोईर यांच्याकडुन प्राप्त झाल्यावर त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये हरकतदार यांचा हरकती अर्ज अंशतः मान्य करण्यात येत असुन मौजे नडगाव,ता.शहापुर जि.ठाणे येथील फेरफार क्रमांक 3194 दिनांक 10/8/2021 ही नोंद नामंजुर करण्यात येत असल्याबाबत नमुद केलेले आहे.

तहसीलदार, शहापुर यांनी नमुद खटल्याचा निकाल माझी आई,मामा व मावशी यांच्या विरुध्द दिलेला असल्याने आता मिलींद राऊत अथवा ओंकार पातकर हे माझ्याकडुन लाचेची रक्कम स्वीकारणार नाहीतअशी माझी खात्री झालेली आहे

तरी यातील लोकसेवक श्री मिलींद नारायण राऊत,शिपाई,नेमणुक तहसीलदार कार्यालय,शहापुर जि.ठाणे यांनी लोकसेवक या नात्याने त्यांना मिळालेल्या पदाचा दुरुपयोग करुन तहसीलदार,शहापुर यांच्याकडे दाखल खटला क्रमांक 47/2021 मध्ये माझी आई,मामा व मावशी यांच्या बाजुने निकाल देण्यासाठी व त्याची प्रत देण्यासाठी तहसीलदार,शहापुर यांच्या करिता माझ्याकडे रुपये 2,50,000/-(दोन लाख पन्नास हजार) रकमेची लाचेची मागणी केली तसेच खाजगी इसम ओंकार एकनाथ पातकर यांनी देखील तहसीलदार,शहापुर यांच्याकडे दाखल खटला क्रमांक 47/2021 मध्ये माझी आई,मामा व मावशी यांच्या बाजुने निकाल देण्यासाठी व त्याची प्रत देण्यासाठी तहसीलदार,शहापुर यांच्याकरिता माझ्याकडे रुपये 3,00,000/-(तीन लाख) रकमेची लाचेची मागणी केली आहे म्हणुन त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई होण्याकरिता माझी फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

RAJKUMAR MARUTI UPASE(I (Inspector)) / PCMH85787 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:**

**Rank** (पद)**:** **No.**(क्र.)**:**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**:**

V.B.Bhg.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ)**:**

फिर्यादीची प्रत मिळाली
V.B.Bhg.

[signature]

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव)**:** RAJKUMAR MARUTI U
**Rank**(पद)**:** I (Inspector)
**No.**(सं.)**:** PCMH85787

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)